आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – संध्या ७ वाजता

६ ऑक्टोबर २०२३ – शुक्रवार

**ठळक बातम्या**

- येत्या २ वर्षात देशातून नक्षलवाद हद्दपार करण्याचा विश्वास केंद्रीय गृहमंत्र्यांकडून व्यक्त
- राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुठलाही वाद नसल्याचा शरद पवार गटाचा केंद्रीय निवडणूक आयोगापुढं दावा, पुढची सुनावणी सोमवारी
- मुंबईत इमारतीला लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर
- सर्व सरकारी रुग्णालयातली डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदं भरण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश
- आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष हॉकीमध्ये भारतीय संघाला सुवर्ण पदक

**आणि**

- मुंबई, पुण्यासह राज्यातल्या काही भागातून मान्सून माघारी

**<><><><><>**

येत्या दोन वर्षात देशातून नक्षलवादाचा पूर्ण नायनाट करू, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना केली आहे. नक्षल प्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत नक्षलवादासंदर्भात झालेल्या बैठकीत बोलत होते. 2019 पासून यातील बाधीत क्षेत्र कमी होत आहेत. आम्ही निमलष्करी दलाच्या 195 नवीन शिबिरांची स्थापना केली. आणखी 44 नवीन शिबिरं स्थापन केली जातील, अशी माहिती शाह यांनी दिली.

**<><><><><>**

नक्षलवाद्यांचा प्रतिबंध करतांना दुसरीकडे गेल्या वर्षभरात नक्षलग्रस्त भागात विविध विकासाच्या योजना परिणामकारकपणे राबवल्या जात आहेत. त्यामुळं गडचिरोलीसारख्या भागातला नक्षलवाद पूर्णपणे संपवण्यात आम्ही लवकरच यशस्वी होऊ, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. नवीदिल्लीतल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. समाज माध्यमांच्या आधारे शहरी नक्षलवाद फोफावतो आहे. त्याला रोखण्यासाठी एक सक्षम यंत्रणा निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. नक्षलवाद्यांना मिळणारं अर्थसहाय्य थांबवण्यासाठी ईडी, आयकर विभाग, तसंच वित्तीय गुप्तचर विभागांचा एक संयुक्त गट तयार करून याची सखोल चौकशी करावी, अशी विनंतीही या बैठकीत केल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. आपतकालीन परिस्थितीत लष्कराप्रमाणेच, ऑपरेशन आणि बचाव कार्यादरम्यान रात्री हेलीकॉप्टर उतरवण्याची परवानगी मिळावी, या भागात रेल्वे सुरू करावी, असंही ते म्हणाले.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कुठलाही वाद नाही, शरद पवार हेच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याचा दावा शरद पवार यांच्या गटानं आज केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणीत केला. पक्षाचे ९९ टक्के कार्यकर्ते यांच्या शरद पवार यांच्यासोबत असल्याचा दावा केल्याचं वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सुनावणीनंतर वार्ताहरांना सांगितलं. काही चुकीची, बनावट आणि अपुरी कागदपत्रं सादर करुन पक्षात वाद असल्याचा दावा अजित पवार गटानं केला आहे. पक्षाची घटना त्यांना पाळायची नाही, आमदार आणि खासदारांच्या समर्थनाच्या आधारावर

पक्षाचं नाव आणि निवडणूक चिन्हावर केलेला दावा शिवसेनेच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानं मान्य केलेला नसल्याचं सिंघवी यांनी आयोगाला सांगितलं. अजित पवार गटासोबत असलेल्या आमदार-खासदारांना मिळालेली मतं ग्राह्य धरुन निर्णय द्यावा हा दावा आश्चर्यकारक असल्याचं सिंघवी म्हणाले. याप्रकरणी पुढची सुनावणी सोमवारी होणार असून यावेळी अजित पवार गटाचं म्हणणं ऐकून घेतलं जाईल.

<><><><><>

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या पात्रतेच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात ३ नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. विधानसभा अध्यक्ष अपात्रतेच्या याचिकेवर निर्णय घेण्यात वेळकाढूपणा करत असल्याचा आरोप करत उद्धव ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. विधानसभा अध्यक्षांनी याप्रकरणाच्या सुनावणीचं वेळापत्रक जाहीर केलं आहे.

<><><><><>

मुंबईत गोरेगाव इथं  उन्नत नगर परिसरात पहाटे एका इमारतीला आग लागून झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला तर ५१ जण जखमी झाले. त्यातल्या पाच जणांची प्रकृती चिंताजनक आहे. पहिल्या मजल्यावर अडकलेल्या  ३० रहिवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे.

मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपये मदत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्चही राज्य सरकार करणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही दुर्घटनेबद्दल तीव्र शोक प्रकट केला आहे. केंद्रसरकार मृतांच्या कुटुंबांना दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य करणार आहे.

**<><><><>**

सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि सहायक कर्मचाऱ्यांची कोणतीही पदं रिक्त राहता कामा नये, असे सक्त निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. दोन सरकारी रुग्णालयांमध्ये नुकत्याच मोठ्या संख्येनं झालेल्या रुग्णांच्या मृत्यूंची स्वतःहून दखल घेत न्यायालयानं सरकारला नोटीस बजावल्यानंतर, याप्रकरणी आज मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती डी के उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढं सुनावणी झाली. महाराष्ट्र वैद्यकीय साहित्य खरेदी प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती दोन आठवड्यांच्या आत करण्याचे निर्देशही खंडपीठानं राज्याला दिले आहेत.

मृत्यू झालेल्या रुग्णांपैका बहुतांश रुग्ण अत्यंत गंभीर अवस्थेत या रुग्णालयांमध्ये दाखल झाले होते, या सरकारच्या उत्तरावर न्यायालयानं नाराजी व्यक्त केली. सार्वजनिक आरोग्य सेवा बळकट करण्यासाठी सरकारकडे काय योजना आहे, अशी विचारणा त्यांनी केली. सार्वजनिक आरोग्य सेवेसाठी अर्थसंकल्पातली तरतूद घसरल्यावर न्यायालयानं रोष व्यक्त केला. या प्रकरणी पुढची सुनावणी ३० ऑक्टोबरला होईल. तोपर्यंत ही सगळी माहिती शपथपत्राद्वारे सादर करावी, असे निर्देश न्यायालयानं दिले.

**<><><><>**

भारतीय रिझर्व बँकेनं वित्त आणि पत धोरणाचा द्वैमासिक आढावा आज प्रसिद्ध केला. या आढाव्यात व्याजदरातही बदल झालेला नाही. गेल्या ३ आढाव्यांमधेही व्याजदर बदलले नव्हते. २०२३-२४ या वर्षासाठी रिझर्व बँकेनं स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज वर्तवला आहे.

<><><><><>

महिलांच्या हक्कांसाठी लढा देणाऱ्या मानवाधिकार कार्यकर्त्या नर्गिस मोहम्मदी यांना यंदाचा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे. नर्गिस मोहम्मदी इराणच्या नागरिक असून सध्या त्या तुरुंगवासात आहेत.

<><><><><>

मलकापूर वरून छत्रपती संभाजी नगरकडे जात असलेली एसटी बस बुलडाणा-धाड रस्त्यावरील दुधा घाटात कोसळल्यामुळे 12 ते 13 प्रवासी जखमी झाले. घाटात कोसळल्यानंतर 20 ते 25 फुटांवर एका झाडावर अडकल्यामुळे मोठा अनर्थ टळला. स्थानिकांच्या मदतिने जखमींना आणि इतर प्रवाशांना बसच्या बाहेर काढण्यात आलं.

<><><><><>

चीनमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतानं ऐतिहासिक कामगिरी करत आतापर्यंत 95 पदकं पटकावली आहेत. यात 22 सुवर्ण, 34 रौ◌ैप्य आणि 39 कांस्य पदकांचा समावेश आहे. हॉकीच्या अंतिम सामन्यात आज भारताच्या पुरुष संघानं जपानचा 5-1 नं पराभव करत सुवर्ण पदक जिंकलं. कुस्ती मध्ये 62 किलो वजनी गटात सोनमनं चीनच्या लाँग जियाचा 7-5 नं पराभव करत कांस्य पदक पटकावलं. 75 किलो वजनी गटात किरन बिश्णोईनं मंगोलियाच्या अर्जुनजरगाल गनबतला 6-3 ने नमवत कांस्य पदक जिंकलं, तर पुरषांच्या 57 किलो वजनी गटात अमननं लीऊ मिंघूला 11-0 ने हरवत कांस्य पदक जिंकलं. तिरंदाजीत भारतीय महिला खेळाडुंनी व्हिएतनामला 6-2 नं नमवत कांस्य पदक

पटकावलं. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉयनं चीनच्या ली शी फेंगला 2-0 नं हरवत कांस्य पदक पटकावलं.

**<><><><>**

नैऋत्य मौसमी पाऊस मुंबई, पुण्यासह, रायगड, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्राच्या काही भागातून आज माघारी फिरल्याचं हवामान विभागानं जाहीर केलं. येत्या २-३ दिवसात राज्याच्या आणखी काही भागातून हा पाऊस माघारी फिरेल यासाठी पोषक वातावरण असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

**<><><><>**

देशातल्या शेवटच्या नागरिकांपर्यंत आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी केंद्र सरकार विविध योजना राबवतं आहे. त्या नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी वैद्यकीय क्षेत्रातल्या सर्व घटकांनी मदत करावी, असं आवाहन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी केले आहे. नाशिकमध्ये दोन दिवसीय सीएचओ परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.

**<><><><>**

मेरी मिट्टी मेरा देश याअभियानाअंतर्गत आज **नाशिक** महानगरपालिकेच्या नाशिक पूर्व विभागाच्या वतीनं जुने नाशिक परिसरात भव्य रॅली काढण्यात आली होती.

**नवी मुंबईतही** मेरी मिट्टी मेरा देश उपक्रमांतर्गत आठही विभागांमधली माती संकलित केलेले अमृत कलश वाजत गाजत महापालिका मुख्यालयात आणण्यात आले.

**सिंधुदुर्गात** नगर विकास विभागा मार्फत अमृत कलश यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. सावंतवाडी, मालवण, वेंगुर्ला, कणकवली, देवगड-जामसंडे, कुडाळ, कसई-दोडामार्ग आणि वाभवे-वैभववाडी या आठही भागातल्या मातीने भरलेले अमृत कलश यात सहभागी झाले होते.

**//<><><><><>//**